# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ / फाल्गुन २९, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १६**

---

### मौजे भेंडाळा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय जमिनीच्या विक्रीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * ६७४५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अमोल मिटकरी:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भेंडाळा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) गावातील शासकीय जमीन गट नं.२१४ ही वर्ग-२ ची जमीन असून त्यातील ३१ एकर १९ गुंठे 'वर्ग-२' इनामी जमिनीची जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय केवळ २.३ कोटी रुपयांना विक्री केल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचे गैरमार्गाने हस्तांतरण केले असून, वर्ग-२ च्या जमिनीस सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक असून सातबाऱ्यावर हस्तांतरण बंदीचा स्पष्ट उल्लेख असताना देखील ऑनलाईन फेरफार न करता ऑफलाईन पध्दतीने या जमिनीची बेकायदेशीर नोंदणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन नियमांची पायमल्ली करून बेकायदेशीर व्यवहाराची नोंदणी करणारे दुय्यम निबंधक, निवृत्त तलाठी, संबंधित खरेदीदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) मौजे भेंडाळा, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र. २१४ मधील क्षेत्र ३१ एकर १९ गुंठे ही मिळकत हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करणेबाबत अधिनियम, १९५४ नुसार मदद मश निर्बंधीत सत्ता प्रकार भोगवटादार वर्ग-२ आहे. परंतु हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करणे अधिनियम, १९५४ मध्ये दिनांक १७/०८/२०१५ अन्वये केलेल्या सुधारणेनुसार, मदद मश प्रकारातील जमीन कृषी संबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरीत करतांना जिल्हाधिकारी यांची पुर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

सदर जमीन दस्त क्र. ६९१८/२०२५, दिनांक १७/११/२०२५ अन्वये विक्री केलेली आहे. सदरचा दस्त ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेला आहे.

तथापि, खरेदी खतानंतरचा फेरफार ई-म्युटेशन प्रणालीव्दारे नियमित पध्दतीने घेण्याऐवजी, आदेश व दस्तऐवज प्रकारातून ग्राम महसूल अधिकारी सजा मौजे भेंडाळा यांनी चुकीच्या पध्दतीने नोंदविलेला आहे. त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी यांना दिनांक १६/१२/२०२५ रोजी निलंबित केलेले आहे व त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट जन्म-मृत्यू दाखले रद्द करण्याचे आदेश दिल्याबाबत

**(२) * ७१९५ श्री.योगेश टिळेकर, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत काही महिन्यांपासून बनावट जन्म-मृत्यू दाखले देणारी मोठी साखळी सक्रिय असल्याचे निदर्शनास आले असून, सायबर गुन्हेगारांनी नगरपरिषदा किंवा ग्रामपंचायतींचे शासकीय पोर्टल (CRS - Civil Registration System) हॅक करून किंवा त्यांचे लॉगिन आयडी आणि पासवर्ड चोरून उक्त दाखले तयार केले असल्याने राज्य शासनाने विशेष तपास पथक स्थापन करुन सदर गैरप्रकार रोखण्यासाठी बनावट जन्म-मृत्यू दाखले त्वरित रद्द करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील देवनार, मुलुंड व कुर्ल्यामध्येही बनावट जन्म प्रमाणपत्र, पदव्या व गुणपत्रिका देणारी साखळी कार्यरत असून प्रमाणपत्रात दुरुस्ती करण्यासाठी खोटी व बनावट कागदपत्रे सादर करुन प्रशासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी कुर्ला पोलिसांनी १५ जणांवर गुन्हा दाखल केला असून परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध विद्यापीठांच्या बनावट गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रे उपलब्ध करून दिल्याच्या आरोपाखाली मुंबईत एका व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने, अनेक ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे गैरप्रकार झाल्याचे आढळल्यामुळे उक्त प्रमाणपत्रांची फेरतपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ३९०० लोकसंख्या असलेल्या भवानी ग्रामपंचायतीमध्ये ६ हजार बनावट जन्म-मृत्यू नोंदी झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून बिहार येथील आरोपीने बनावट युजर आयडी वापरून शेंदुरसनी आणि भवानी या ग्रामपंचायतींमध्ये हजारो बनावट नोंदी केल्याचे तपासात आढळल्यामुळे अशा

बेकायदेशीर नोंदणीमुळे शासकीय नियमांचे उल्लंघन होऊन राष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट कागदपत्रांवरून दाखले देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणात आतापर्यंत किती व्यक्तींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व या प्रकरणी फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

ग्रामपंचायत शेंदूरसनी ता.आर्णी जि.यवतमाळ येथे सिआरएस सॉफ्टवेअरच्या लॉगिन मध्ये जन्म-मृत्यूच्या अवैध नोंदणी आढळून आल्या. त्याची चौकशी करण्यासाठी गृह विभाग, आदेश एसआयटी-१०२५/ प्र.क्र.१४९/ विदेशी-२, दिनांक २४/१२/२०२५ अन्वये अपर पोलीस महासंचालक, सायबर महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली SIT (विशेष तपास पथक) स्थापन करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत, भवानी ता.उमरखेड जि.यवतमाळ येथे ९०० जन्माच्या व २ मृत्यू नोंदी अवैधरित्या घेतल्याचे आढळले. सदर नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत.

तसेच, ग्रामपंचायत शेंदूरसनी ता.आर्णी जि.यवतमाळ येथे सिआरएस सॉफ्टवेअरच्या लॉगिन मध्ये जन्म-मृत्यूच्या अवैध नोंदणी आढळून आल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे दिनांक १६/१२/२०२५ रोजी एफ.आय. आर. दाखल करण्यात आला आहे.

(४) अपर पोलीस महासंचालक, सायबर महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली SIT (विशेष तपास पथक) स्थापन करण्यात आली असून, गृह विभाग, आदेश, दिनांक २४/१२/२०२५ अन्वये सदर समितीस ३ महिन्यात अहवाल सादर करण्याची आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात धुळे-सोलापूर महामार्गाच्या भुसंपादनाचा वाढीव लाभ बनावट आदेशांद्वारे घेतल्याबाबत

**(३) * ७२९२ श्री.एकनाथराव खडसे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-सोलापूर महामार्गासाठी झालेल्या जमीन भूसंपादनात वाढीव मोबदला देण्यासाठी बीड जिल्ह्यात अवघ्या ४८ दिवसांत १५४ बनावट आदेश तयार केल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांच्या बदलीनंतर मागील तारखेच्या स्वाक्षरीचे बनावट आदेश काढून शासनाची ६८.५८ कोटींची मूळ भरपाई रक्कम ३१०.२० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली असून, त्यापैकी ७५ कोटी रुपयांचे वाटपही झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३)

१) धुळे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठीच्या बीड जिल्ह्यातील जमीन संपादन प्रकरणी घोषित निवाड्यांमध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे लवाद म्हणून १५४ प्रकरणी दाद मागण्यात आल्याचे आणि अशा प्रकरणांमध्ये तत्कालीन मा.लवाद तथा जिल्हाधिकारी यांची बदली झाल्यानंतर मागील तारखा टाकुन आदेश निर्गमित झाल्याची बाब निदर्शनास आली. सदर बाब विचारात घेता, संबंधितांविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

२) सदर प्रकरणांशी निगडीत मूळ भुसंपादन निवाडा रक्कम ६८.५८ कोटी असल्याचे आणि मा.लवादाने दिलेल्या निर्णयानुसार सदरची रक्कम व्याजासह ३१०.२० कोटी झाल्याचेही निदर्शनास आले आहे. भूसंपादन जायकवाडी प्रकल्प व उपविभागीय अधिकारी, बीड कार्यालयामार्फत यापैकी ७३ कोटी रुपये संबंधित खातेदारांना वाटप करण्यात आले आहेत. जालना-नांदेड महामार्गाच्या भूसंपादनामध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

३) यासंदर्भात दाखल फिर्यादीच्या अनुषंगाने पोलिसांमार्फत तपास सुरु असून प्रकरणी संबंधितांवर शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड येथे FIR No-५४४/२०२५, दिनांक १९/११/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. तसेच, मा.न्यायालयात दोषारोपपत्र क्र.३४/२०२६, दिनांक १६/०२/२०२६ रोजी पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात शासकीय कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरीचे नमुने देखील अतिरिक्त मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुन्हे अन्वेशन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी पाठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी पोलिसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार यांनी जमीन फेरफार नोंदीसाठी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४) * ७७७६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार यांनी जमीन फेरफार नोंदीसाठी १० लाख रुपयांची रक्कम घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीही दोन मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर बेकायदेशीररित्या रक्कम घेतल्याबाबत कारवाई झाली असताना तहसिलदार यांनी सदर गैरव्यवहाराला रोखण्यासाठी कोणतीही उपाययोजना न केल्याने त्यांचा सदर गैरव्यवहारात सहभाग असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिन्नर तहसिल कार्यालयात सातबारा व फेरफार दुरुस्तीसाठी हेतूपुरस्सर चुका करुन त्या दुरुस्त करण्यासाठी नागरिकांची आर्थिक लूट केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी समिती स्थापन करुन गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सिन्नर (जि.नाशिक) तहसिल कार्यालयातील तत्कालीन नायब तहसिलदार (महसूल) यांना जमीन फेरफार नोंदीसाठी रुपये २,५०,०००/- इतक्या रकमेची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १०/१२/२०२५ रोजी पकडले आहे हे खरे आहे.
(२) अन्य एका प्रकरणात पोटहिस्सा मोजणी होऊन शेत जमिनीचा ७/१२ उतारा वेगळा करण्याकरीता तत्कालीन मंडळ अधिकारी, डुबेर, तत्कालीन मंडळ अधिकारी, वडांगळी व तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, ठाणगांव यांना रुपये १,००,०००/- इतक्या रकमेची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०५/११/२०२५ रोजी पकडले आहे हे खरे आहे. सदर गैरव्यवहारात तहसिलदार, सिन्नर यांचा कोणत्याही प्रकारचा सहभाग दिसून येत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) तत्कालीन नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, सिन्नर जि.नाशिक यांना विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील दिनांक २२/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
तत्कालीन मंडळ अधिकारी, डुबेर, तत्कालीन मंडळ अधिकारी, वडांगळी व तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, ठाणगांव यांना जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील दिनांक १४/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथील भूखंड “जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन” ला दिल्याबाबत

**(५)** * **७७८५ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या पाच प्रमुख खेळाच्या मैदानांपैकी एक मैदान सन १८३२ मध्ये 'ख्रिश्चन रिफॉर्म युनायटेड पिपल्स असोसिएशन' यांना भाडेकराराने देण्यात आले होते व सदर भाडेकराराची मुदत संपुष्टात आल्यानंतर संबंधित असोसिएशनने शासनाकडे अर्ज सादर करूनही त्यांना मुदतवाढ अथवा नवीन भाडेकरार देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथील ऐतिहासिक व सार्वजनिक वारसा असलेल्या विल्सन जिमखान्याचे नामकरण बदलून 'जैन जिमखाना' करण्यात आले असून, सदर जिमखान्याचा शासकीय भूखंड कोणतीही खुली निविदा प्रक्रिया, सार्वजनिक सूचना न देता तसेच स्थानिक रहिवाशांचा विरोध असतानाही 'जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन' ला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जिमखान्याचा शासकीय भूखंड कोणतीही खुली निविदा प्रक्रिया, सार्वजनिक सूचना न देता “जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन” ला देण्यात आल्याबाबतच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) भूलेश्वर महसूल विभागातील भू.क्र.४७१ ही शासकीय मिळकत Dr. Judson w. Airan, Principal of the Wilson college and ex-officio President of the Wilson College Gymkhana यांना दिनांक ०१/०१/१९४० पासून ३० वर्षाच्या मुदतीकरीता भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली होती. तद्नंतर सदर मिळकतीचे दिनांक ०१/०१/१९७० पासून ३० वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात आले. त्यानुषंगाने दिनांक १५/०९/१९९८ रोजी भाडेपट्टा दस्त युनायटेड चर्च ऑफ नॉर्थन इंडीया ट्रस्ट असोसीएशन यांचे नावे निष्पादीत करणेत आला.

सदर मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ३१/१२/१९९९ रोजी संपुष्टात आला. भाडेकरार संपुष्टात आल्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे मुदतवाढीसाठी अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २२/०९/२००३ अन्वये जिमखान्यांच्या संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेत आले होते. सदर धोरणातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडील दिनांक २२/१०/२००३ रोजीच्या पत्रानुसार विल्सन कॉलेज जिमखान्यास नोटीस देण्यात आलेली होती. परंतु सदर शासन निर्णयास मा.मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२/०९/२००३ रोजीचे धोरण रद्द केले. त्यामुळे त्यावेळी मुदतवाढ देता आली नाही.

तद्नंतर महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २३/०६/२०१७ रोजी नव्याने धोरण तयार करण्यात आले सदर धोरणातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडील दिनांक २९/१०/२०१८ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये सन २०१७ ते २०१८ करीताचे सुधारीत भुईभाडे रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आले.

विल्सन कॉलेज जिमखाना या मिळकतीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने शर्तभंगाबाबत सुनावणी घेवून सदरची मिळकत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक ०५/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनजमा केली.

तद्नंतर, शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक २५/०७/२०१९ मधील तरतुदीनुसार शासन ज्ञापन दिनांक १६/०३/२०२४ अन्वये सदरची शासकीय मिळकत जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला जिमखाना या प्रयोजनासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला जिमखाना या प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने जमीन वाटप करित असताना जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयात अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

विषयाधीन मिळकतीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये Writ Petition No.४९२२ of २०२४, Writ Petition No.६१५० of २०२४ व Writ Petition (L) No.२३५७९ of २०२४ दाखल असून सदरची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधील सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत बॅटरी खरेदीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ७८७७ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील १२ शासकीय आश्रमशाळांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत 'लिथियम' (Lithium) बॅटरीऐवजी 'ट्युब्युलर' (Tubular) बॅटरी वापरून शासनाची फसवणूक केली असून, ट्युब्युलर बॅटरीचे आयुष्य कमी असल्याने लवकरच या आश्रमशाळांमध्ये वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्या निर्माण होऊन कमी गुणवत्तेच्या बॅटरीमुळे पुन्हा देखभालीचा खर्च वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत बॅटरी खरेदीत अंदाजे ८७ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च दाखवून सुमारे १.९२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विकास विभागाने मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये नेमकी कोणत्या प्रकारची बॅटरी खरेदी करण्याचे निर्देश दिले होते आणि प्रत्यक्षात नियमांचे उल्लंघन करून निकृष्ट दर्जाचे साहित्य का खरेदी करण्यात आले या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शासनाने समिती नियुक्त करुन तिचा अहवाल सादर करुन प्रकल्पाच्या अंमलबजावणीत दोषी आढळणारे कंत्राटदार, पुरवठादार आणि आदिवासी विकास विभागातील जबाबदार अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकल्पाकरीता आदिवासी विकास विभागामार्फत १२ आश्रमशाळांसाठी मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये एकूण १.८७ कोटी रुपयांची तरतूद आहे. सदर सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत एकूण १२ आश्रमशाळांच्या छतावर पारेषण संयंत्र Battery backup सह (Hybrid) यंत्रणा आस्थापित करण्याच्या कामामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. ज्यामध्ये सौर पॅनल,Inverter, (Lithium) Life Po ४ बॅटरी, Lightning Arrester तसेच विद्युतीकरणाच्या कामाचा अंतर्भाव आहे. वापरण्यात आलेल्या लिथियम (Lithium) बॅटरीचे वॉरंटी कार्ड ५ वर्षांचे आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून व तांत्रिक मान्यतेनुसार सदर कामे पूर्ण होत असल्याने कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) * ८१४७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी क्षेत्र आधुनिक, उत्पादनक्षम व तंत्रज्ञानावर आधारित करण्याच्या उद्देशाने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित धोरण राबविण्याकरीता निवडण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (CEO) पदभार स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे सदर महत्वाकांक्षी प्रकल्प सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवड प्रक्रिया माहे जून, २०२५ मध्ये पूर्ण होऊनही प्रशासकीय स्तरावरील अटी, सेवा अटी व अधिकाराबाबत स्पष्टता नसल्यामुळे पाच तज्ज्ञांनी पदभार स्वीकारण्यास नकार दिला असून सध्या या अत्यंत महत्त्वाच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार एका उप सचिवांकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'एआय' आधारित कृषी धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने ५०० कोटी रुपयांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद केली असतानाही स्पष्ट धोरणात्मक आराखड्याचा अभाव, आवश्यक तांत्रिक मनुष्यबळाची अनुपलब्धता व नेतृत्वाचा अभाव यामुळे या निधीचा विनियोग अत्यंत संथ गतीने होत असल्यामुळे शासनाच्या उद्दिष्टांवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त असलेली तज्ज्ञांची पदे तातडीने भरून आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, कृषी एआय प्रकल्प गतीने कार्यान्वित करणे तसेच भविष्यकाळात अशा महत्त्वाकांक्षी व नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी तज्ज्ञांच्या नियुक्ती प्रक्रियेत सुलभता, स्पष्ट सेवा अटी तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) निवड प्रक्रियेअंती ५ तज्ञांनी पदभार स्विकारण्यास नकार दिला ही बाब खरी नाही. उप सचिवांकडे व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार देण्यात आलेला आहे.
(३) सदर योजनेसाठी सन २०२५-२९ या कालावधीसाठी एकूण रुपये ५०० कोटींची तरतूद जाहीर केलेली आहे. सन २०२५-२६ साठी रुपये ३०.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. धोरणांतर्गत अन्य तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करून या धोरणाची अंमलबजावणी समाधानकारक रित्या सुरू आहे.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

-----------------

## आदिवासी विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) * ८२५० डॉ.परिणय फुके:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती' योजनेंतर्गत सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन शैक्षणिक वर्षांपासून अनेक पात्र आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कालावधीत शासनाकडून शिष्यवृत्ती अनुदान मंजूर झालेले असतानाही, यंत्रणेतील त्रुटी, प्रशासकीय दिरंगाई व अपुऱ्या पाठपुराव्यामुळे २३६ आदिवासी विद्यार्थ्यांना वेळेत शिष्यवृत्तीचा लाभ न मिळाल्यामुळे फी भरणे, शैक्षणिक साहित्य खरेदी व उच्च शिक्षण घेणे कठीण झाले असून, यामुळे शासनाच्या आदिवासी शिक्षणविषयक उद्दिष्टांवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शिक्षणाधिकारी, विभागीय अधिकारी व यंत्रणा यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली नसल्याने शिष्यवृत्ती वितरण प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन, प्रशासकीय निष्काळजीपणा व शासकीय निधीचा अपव्यय झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने भविष्यात आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळेत, थेट व पारदर्शक पध्दतीने मिळावा यासाठी शासन प्रणालीत सुधारणा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) ते (४) अंशत: खरे आहे.

बीड जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षातील लाभ जिल्हा परिषद, बीड कार्यालयामार्फत उशिराने देण्यात आलेला असून खालीलप्रमाणे निधीचे वितरण करण्यात आले आहे.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | निधी वाटप दिनांक |
|---|---|---|
| २०२२-२३ | ७८३ | ०७/०८/२०२४ |
| २०२३-२४ | ११२३ | ०६/०१/२०२६ |
| २०२४-२५ | ११२४ | २६/०२/२०२६ रोजी भारतीय स्टेट बँक शाख, बीड येथून गटशिक्षणाधिकारी यांच्या बँक खाती RTGS करणेसाठी धनादेश जमा करण्यात आला आहे. |

शिष्यवृत्ती वितरणास झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने बीड जिल्हा परिषदेतील जबाबदार कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगात्मक कारवाई होणेकरीता जिल्हा परिषद बीड येथे नस्ती कार्यान्वित करण्यात आली असून सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

तसेच शिक्षणाधिकारी, जि.प., बीड यांच्याविरुध्द शिस्तभंगात्मक कारवाई होणेसाठी जि.प.बीड कडून आयुक्त (शिक्षण) पुणे यांच्याकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(९) * ८५१३ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोरेगाव, गोंदिया, अर्जुनी, मोरगाव, देवरी या तालुक्यातील जवळपास ८० हजार शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होऊन नुकसान भरपाईकरीता ७८ कोटी १३ लाख रुपयांचा निधी मंजूर असूनही अद्याप नुकसान भरपाई न मिळाल्याने बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गोंदिया जिल्ह्यातील ८० हजार शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) गोंदिया जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित ९०,४२३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात DBT प्रणालीद्वारे रुपये ६१.०१ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा वाघोडा (रिठी) (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील गिट्टी खदान बंद करण्याबाबत

**(१०)** * **८५४७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वाघोडा (रिठी) (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील सर्वे नं.५३ मध्ये सुरू असलेली गिट्टी खदान तसेच सर्व्हे नं.५६ मध्ये खानपट्ट्यांमुळे मौजा साटवाडी, पालोरा, वाघोडा, पार्डी व बाबडी या गावांतील नागरिकांना व शेतकऱ्यांना सदरहू खदानीच्या ब्लास्टिंगमुळे व धुळीमुळे नाहक त्रास होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ब्लास्टिंगमुळे शेती नापीक होत असल्याने ही गिट्टी खदान बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (वि.प.स.) यांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीनुसार उक्त खदान बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजा वाघोडा (रिठी), ता.कारंजा येथील खाजगी जमीन ग.नं.५३ मधील ०१.६६ हे.आर क्षेत्रावर मंजूर असलेल्या खाणपटटयाचे अटीवर जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक १८/११/२०२५ च्या आदेशान्वये पाच वर्षाच्या कालावधीकरीता केले आहे. तर मौजा वाघोडा (रिठी) ता.कारंजा येथील ग.नं. ५६ मध्ये नवीन खाणपटटाकरीता खाणपटटाधारक यांनी अर्ज सादर केला असून, त्यांनी आवश्यक नाहरकत/कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याने त्यांना खाणपटटा मंजूर करण्यात आलेला नाही.

तालुका अधिकारी, कारंजा यांच्या अहवालानुसार कारंजा तालुका अंतर्गत सारवाडा, पालोरा, वाघोडा व पार्डी या गावातील नागरिकांना खदानीच्या ब्लास्टींगमुळे परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच तालुका कृषी अधिकारी कारंजा व पोलीस स्टेशन, तळेगाव यांच्याकडे खदानीच्या ब्लास्टींगमुळे व धुळीमुळे त्रास होत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या विषयाबाबत मा.विधानपरिषद सदस्य यांनी मा.मंत्री (महसूल) यांना पाठविले त्या निवेदनावर तात्काळ कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी, वर्धा यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यावर जिल्हाधिकारी वर्धा यांनी सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी, आर्वी व तहसिलदार कारंजा यांना दिनांक २७/०२/२०२६ रोजी दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पालघर जिल्ह्यातील मच्छीमारांची पाकिस्तानी सुरक्षा यंत्रणेच्या ताब्यातून सुटका करण्याबाबत

**(११) * ८५५५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील काही मच्छीमार गुजरात राज्याच्या बंदरांमार्गे खोल समुद्रात मासेमारीसाठी गेले असताना चुकून पाकिस्तानच्या समुद्री सीमेत प्रवेश झाल्यामुळे संबंधित देशाच्या सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना ताब्यात घेण्यात आल्याची घटना घडली असून, या मच्छीमारांच्या सुटकेसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी देशाच्या परराष्ट्र मंत्र्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सातपाटी, डहाणू तसेच इतर किनारपट्टी भागातील संबंधित मच्छीमारांची सुरक्षित सुटका व्हावी यासाठी केंद्र शासनाशी समन्वय साधून राज्य शासनाने कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित मच्छीमारांच्या अनुपस्थितीत त्यांच्या कुटुंबीयांवर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याने अशा कुटुंबांना आर्थिक मदत, अनुदान, विमा सहाय्य, मासेमारी अनुदान किंवा इतर कोणती तात्पुरती मदत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील एकूण १९ मच्छिमार पाकिस्तानच्या ताब्यात असून, ते गुजरात राज्याच्या बंदरामार्गे खोल समुद्रात मासेमारीसाठी गेले असताना, चूकून पाकिस्तानच्या समुद्री सिमेत प्रवेश झाल्यामुळे संबंधित देशाच्या सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर खालाशीं बाबत मत्स्यव्यवसाय विभाग ओखा गुजरात यांनी परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली यांचेशी पत्रव्यवहार केला आहे. तत्कालीन मा.मंत्री (वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय) यांनी अर्धशासकीय पत्रान्वये मा.परराष्ट्र मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली यांना खलाश्यांच्या सुटकेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

(३) मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन निर्णय, दिनांक ०२/०८/२०२३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील मासेमारी नौका नजरचुकीने पाकिस्तान देशाच्या सागरी हद्दीमध्ये प्रवेश केल्यास, पाकिस्तानच्या मेरीटाईम सिक्युरिटी एजन्सीने पकडल्यास, अशा मच्छिमार / खलाशांच्या निराधार कुटुबांना उदरनिर्वाहासाठी प्रतिदन रुपये ३००/- या प्रमाणे आर्थिक मदत / अर्थसहाय्य देण्यात येते.

पालघर जिल्ह्यातील या १९ खलाशांच्या निराधार कुटुंबांना रुपये ७२.४३ लक्ष इतका निधीचा वाटप करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पाचोरा (जि.जळगाव) येथील तहसिल कार्यालयाने शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई अनुदानामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१२) * ७७७९ ॲड.अनिल परब, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) येथील तहसिल कार्यालयातील सहाय्यक लिपिक व एका प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांने संगनमत करुन खरीप हंगामातील शेतकऱ्यांच्या आपत्ती नुकसान भरपाई अनुदानातील सुमारे १ कोटी २० लाख रुपयांच्या रकमेचा अपहार केला असून संबंधित आरोपींनी तहसिलदार यांचा लॉग-इन-आयडी व पासवर्ड बेकायदेशीरपणे वापरुन बनावट लाभार्थ्यांची नावे नोंदवली आणि मूळ पात्र शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट याद्या तयार करण्याच्या व त्या प्रणालीत समाविष्ट करण्याच्या कामात पाचोरा तहसिलदार व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असूनही त्यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही तसेच सदर प्रकरणात पाचोरा तहसिलदारांच्या भूमिकेबद्दल, तहसिलदार यांच्या लॉगिन आयडी व पासवर्डची अत्यंत गोपनीय माहिती अपहारकर्त्यांना कशी प्राप्त झाली याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी संशय व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुक्ताईनगर तालुक्यातही माहे जुलै ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील नैसर्गिक आपत्तीच्या लाभार्थ्यांची बनावट यादी तयार करून तलाठी व तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी लाखो रुपयांच्या निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित आरोपीसह तहसिलदार व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अपहार केलेल्या रकमेची दोषींकडून वसूली करुन ती मूळ पात्र शेतकरी लाभार्थ्यांना वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पाचोरा तालुक्यातील शेतकरी अनुदान प्रकरणात बनावट यादीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल करतेवेळी शेतकरी अनुदान यादीत रुपये १,२०,१३,५१७/- इतक्या रक्कमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले होते. परंतु सन २०२३ व सन २०२४ चे शेतकरी अनुदान याद्यांच्या पडताळणीनंतर सदरची आर्थिक अपहाराची रक्कम रुपये २,०७,५०,५९७/- असल्याचे निदर्शनास आले आहे. तहसिलदार, पाचोरा यांचेकडील अहवालानुसार कोणताही पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहिलेला नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पाचोरा तहसिल कार्यालयातील तहसिलदारांच्या लॉगिन आयडी व पासवर्डचा गैरवापर करून, शेतकरी नसलेल्या व्यक्तींच्या खात्यात अनुदानाची रक्कम वर्ग करण्यात आली. तसेच बनावट पंचनामे तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे.

या प्रकरणी पाचोरा पोलीस स्टेशनमध्ये संबंधित महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी (सारोळा), मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी व अन्य ४ खाजगी व्यक्ती यांच्याविरूध्द गुन्हा (गु.र.नं.

४२८/२०२५) दाखल असून, तपास आर्थिक गुन्हे शाखा, जळगाव करत आहेत. सदरच्या ०७ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांचे जामीन अद्याप मंजूर झालेले नाहीत. त्यांच्याविरूध्द दिनांक २२/१२/२०२५ रोजी मा.न्यायालयात आरोपपत्र (Charge Sheet) दाखल करण्यात आले आहे.

संबंधित महसूल सहायक व ग्राम महसूल अधिकारी (सारोळा) यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचा कार्यकाळ दिनांक ३१/०८/२०२५ रोजीच संपला आहे. तसेच संबंधित तहसिलदार, पाचोरा यांच्या पर्यवेक्षकीय कामकाजात त्रुटी आढळल्याने त्याबाबतचा अहवाल व तहसिलदार यांनी दिलेला खुलासा शासनाकडे पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आला आहे.

ज्या अपात्र व्यक्तींच्या खात्यात चुकून रक्कम जमा झाली होती, त्यांना ती रक्कम सरकारी तिजोरीत परत जमा करण्यासाठी तहसिलदार यांच्याकडून नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) महसूल सेवक (साझा उचंदे) यांनी सन २०२३ व २०२४ च्या नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाईच्या याद्यांमध्ये जाणीवपूर्वक फेरफार केल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित महसूल सेवकावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या विविध कलमान्वये गुन्हा क्र.०३४२/२०२५ दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. सध्या त्यांना जामीन मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित महसूल सेवक यांना दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सेवा समाप्तीबाबत नोटीस बजावण्यात आली असून, त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रक्रिया तहसिलदार, मुक्ताईनगर यांच्या स्तरावरून सुरू आहे.

कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल संबंधित ग्राम महसूल अधिकारी (साझा बोरखेडे व उचंदे) आणि संबंधित महसूल सहायक (तहसिल कार्यालय, मुक्ताईनगर) यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या दिनांक ०९/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी एकूण रुपये १५,८४,९१२/- इतक्या रक्कमेचा अपहार झाला असून, त्यापैकी रुपये ८,९२,५००/- इतकी रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. उर्वरित रुपये ६,९२,४१२/- इतकी रक्कम वसुलीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ नुसार नोटीस व मालमत्ता जप्तीची कार्यवाही सुरू आहे. संबंधित महसूल सेवक यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे परस्पर हस्तांतरण रोखण्यासाठी दुय्यम निबंधक, मुक्ताईनगर, ग्रामपंचायत उचंदे आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जळगाव कार्यालयाला तहसिलदार, मुक्ताईनगर यांच्यामार्फत पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्याबाबत

**(१३) * ८१५८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या ४९७ आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ संपायला केवळ तीन महिने शिल्लक असताना अद्याप गणवेश मिळाले नसून, गणवेश

खरेदीची निविदा प्रक्रिया न्यायालयीन वादात अडकल्यामुळे व प्रशासकीय दिरंगाईमुळे या शैक्षणिक वर्षाचे सुमारे सहा महिने उलटूनही राज्यातील हजारो विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाचे मुख्य उद्दिष्ट दुर्गम भागातील मुलांना मुख्य प्रवाहात आणणे आहे, मात्र गणवेशासारख्या मूलभूत गरजेसाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या शेवटी वाट पाहावी लागणे, हे प्रशासकीय नियोजनातील मोठे अपयश मानले जात असून शैक्षणिक सत्र संपत असताना आता स्थानिक स्तरावर गणवेश खरेदीसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे व अशा विलंबाने होणाऱ्या वाटपामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गणवेश वाटपातील या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असा विलंब टाळण्यासाठी सन २०२६-२७ या पुढील शैक्षणिक वर्षाचे गणवेश आगाऊ खरेदी करून माहे जून, २०२६ मध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होताच त्याचे वाटप करण्याबाबत शासनामार्फत काही विशेष धोरणात्मक सुधारणा व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) व (२) राज्यात आदिवासी विकास विभागाच्या ५०० शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दोन शालेय गणवेश देण्यात आले होते. मात्र सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात न्यायालयीन प्रकरणामुळे विद्यार्थ्यांना गणवेश देता येत नव्हते. शासकीय आश्रमशाळेत नविन प्रवेशित विद्यार्थ्यांना किमान एक गणवेश मिळावा या उद्देशाने स्थानिक शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातुन मुख्याध्यापक स्तरावर एक गणवेश उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(३) सन २०२५-२६ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात आली. मात्र यासंदर्भात दाखल याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या अंतरीम आदेशानुसार वित्तीय मान्यता व कार्यादेश देता आले नाहीत. आता दिनांक ०९/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये न्यायालयाने याचिकाकर्त्याची याचिका फेटाळली असल्याने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना विहित वेळेत गणवेश वाटप करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतीकरीता नॅनो युरियाचा वापर करण्यासाठी तसेच सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याबाबत

**(१४) * ८२५९ डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात युरिया या रासायनिक खताचा वापर दिवसेंदिवस वाढत असून भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या सर्वेक्षणानुसार युरियाच्या अतिवापरामुळे पिण्याच्या पाण्यातील नायट्रेटचे प्रमाण ६० ते ८०

मिलीग्राम प्रति लिटरपर्यंत पोहोचले असून यामुळे आरोग्य व प्रदूषणविषयक नियमांचे उल्लंघन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायट्रेटयुक्त दूषित पाण्यामुळे लहान मुलांमध्ये ‘ब्लू बेबी सिंड्रोम’ आणि नागरिकांमध्ये पोटाचा कर्करोग होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला असून सार्वजनिक आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून नैसर्गिक शेती आणि नॅनो युरियाच्या वापरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असतानाही युरियाचा वापर कमी न झाल्याने शासकीय निधीचा विनियोग योग्य पध्दतीने होत नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी युरिया खताचा अतिवापर टाळून नॅनो युरियाचा वापर अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी माहे डिसेंबर मध्ये नायट्रेट बाधित नमून्यांच्या स्त्रोत्राची माहिती कृषी आयुक्तालयास सादर केली होती. परंतु नायट्रेटचे प्रमाण रासायनिक खतांच्या वापरामुळे वाढले आहे हे स्वयंस्पष्ट होत नाही. युरिया लेपित असल्याने (Neam Coated) या खताचे झिरपण्याचे प्रमाण (Leaching Causes) कमी आहे.
(२) याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात येत आहे.
(३) व (४)

नॅनो खतांचे वापरासाठी कोणतीही अनुदानित योजना नाही. परंतु नॅनो युरियाचा प्रचाार होण्यासाठी सन २०२४-२५ मध्ये राज्य पुरस्कृत एकात्मीक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनंतर्गत १९,२४,८३१ नॅनो युरीया बॉटलचा पुरवठा करण्यात आला होता.

सन २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके या योजनेत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार नॅनो खतांचा प्रात्यक्षिकात कृषी विद्यापीठे व तत्सम संस्थांच्या मान्यतेने एक घटक म्हणून वापर करण्यात येतो.

नॅनो युरिया खताचा वापर अनिवार्य करणेबाबत केंद्र शासनाकडून निर्देश देण्यात आलेले नाहीत. राज्यात नॅनो खतांच्या वापरास प्रोत्साहन दिले जाते. तसेच राज्यात नॅनो खताला चालना मिळावी यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येते.

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्सान देण्यासाठी राज्यात केंद्र पुरसकृत परंपरागत कृषी विकास योजना आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०%) तसेच डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन (राज्य हिस्सा १००%) राबविण्यात येत आहे. तीनही योजनांमध्ये मिळून एकूण ७,७८६ गटातील ३.२२ लाख हेक्टर क्षेत्रावरील ४.२५ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यां मान्य करण्याबाबत

**(१५) * ८५४८ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यातील कोरडवाहू जमिनीला पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने यवतमाळ जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या बेंबळा प्रकल्पामुळे अनेक गावे पाण्याखाली गेली असून बाधित लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाल्याने येथील प्रकल्पग्रस्तांनी अनेक वेळा शासनाला आपल्या विविध मागण्यांचे निवेदने दिले असूनही अद्याप त्यावर शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्तांनी शासकीय नोकरी, प्रत्येक कुटुंबाला लाभक्षेत्रातील ५ एकर ओलीताखालील जमीन देणे, प्रत्येक कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी ४० लक्ष रुपये देण्याबाबत व अन्य मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या मान्य करून त्यांना न्याय देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, निवेदन प्राप्त झाले आहे.

बेंबळा नदी प्रकल्पाचे धरणाचे काम २००७ पर्यंत १००% पूर्ण झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील १६ गावांचे २० ठिकाणी आणि अमरावती जिल्ह्यातील ७ गावांचे ७ ठिकाणी १०० % पुनर्वसन व स्थलांतरण सन २००७ पर्यंत पूर्ण झाले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करुन कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे. प्रकल्पग्रस्तांनी खालील मागण्या केल्या आहेत: • प्रत्येक कुटुंबाला शिक्षणानुसार शासकीय नोकरी देणे किंवा

• प्रत्येक कुटुंबाला लाभक्षेत्रातील ५ एकर ओलिताची जमीन देणे किंवा

• उदरनिर्वाहासाठी प्रत्येक कुटुंबाला रुपये ४०.०० लक्ष देणे.

• याशिवाय, कोपरा-२ मध्ये ग्रामपंचायत नसणे आणि जन्म-मृत्यूची नोंद ११ वर्षांपासून होत नसल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/ ०९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या जाहिरातीशिवाय व त्यांची सेवा प्रवेश अहर्ता व गुणवत्ता डावलून करता येणार नसल्याने प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका जाहिरात देऊन संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षा द्वारे गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

२) महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९,कलम १६(२)(ब) मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्तांची पात्रता तपासून पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात येते.
३) पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार प्रकल्प बाधित कुटुंबास उदरनिर्वाहासाठी कोणतीही आर्थिक मदत देण्याबाबत तरतूद नाही.
सद्य:स्थितीत खालील कामे प्रगतीपथावर आहेत: • कोपरा-१ येथील स्मशानभूमीचे काम पूर्ण झाले आहे.
• मौजे बारड येथील स्मशानभूमीसाठी भूसंपादन पूर्ण झाले असून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरू आहे.

कोपरा-२ येथे स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याने आणि लोकसंख्या कमी असल्यामुळे तेथे वेगळी ग्रामपंचायत स्थापन केलेली नाही, त्यामुळे मागील काही वर्षांत जन्म-मृत्यू नोंदणीची अडचण निर्माण झाली होती. या तक्रारीनंतर ग्रामपंचायत कोठा (अलीपूर) यांना निर्देश देऊन कोपरा-२ रहिवाशांचे जन्म, मृत्यू व विवाह नोंदी स्वतंत्र नोंदवहीत घेऊन प्रमाणपत्रे देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील तालुका कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याला मारहाण केल्याबाबत

**(१६)** * **८२६२ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोगरी (ता.मंगरुळपीर, जि.वाशिम) गावात फळबाग योजनेची पाहणी करण्यासाठी गेलेल्या तालुका कृषी अधिकाऱ्याने एका शेतकऱ्याला मारहाण केल्याची घटना घडली असून गोगरी, हिरंगी, खेर्डा बु., खुर्डा खु. येथील शेतकरी गेल्या चार महिन्यांपासून फळबाग योजनेच्या लाभापासून वंचित असून, कृषी सहायकांकडून त्यांना मानसिक व प्रशासकीय त्रास दिला जात असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी यांचेकडे तक्रार केल्यामुळे संतापलेल्या तालुका कृषी अधिकाऱ्याने नियमांचे उल्लंघन करून बेकायदा कृत्य करत शेतकऱ्याला मारहाण केली असून, यामुळे शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या मानसिक व प्रशासकीय त्रासासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने मंगरुळपीर तालुक्यातील गोगरी, हिरंगी, खेर्डा बु., खुर्डा खु. येथील वंचित शेतकऱ्यांना फळबाग योजनेचा लाभा त्वरित मिळवून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, मंगरुळपीर, जि.वाशिम हे अन्य अधिकाऱ्यांसोबत गोगरी (ता.मंगरुळपीर,जि.वाशिम) गावात फळबाग योजनेची पाहणी करण्यासाठी गेले असता, श्री.ऋषिकेश पवार या शेतकऱ्याने फळबागेच्या अनुदानाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करत असताना त्यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची व वादविवाद होवून सदरची घटना झाली असल्याचे उप विभागीय कृषी अधिकारी यांच्या चौकशी अहवालावरुन दिसून येते.

तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, मंगरुळपीर यांचे वर्तन अत्यंत आक्षेपार्ह आणि कठोर प्रशासकीय कारवाईस पात्र असून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग करणारे आहे. त्यामूळे शासनाची प्रतिमा मलिन झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करून तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, मंगरूळपीर यांना शासन आदेश दिनांक १७/०१/२०२६ अन्वये तात्काळ प्रभावाने शासकीय सेवेतून निलंबीत करणेत आलेले असून, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी मंगळूरपीर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दोषारोप जोडपत्र १ ते ४ तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.ऋषिकेश पवार यांनी दिनांक १३/०१/२०२६ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संगणक प्रणालीवर ऑनलाईन तपासणी केली असता त्यांचे महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत संत्रा पिकाचे प्रथम व द्वितीय वर्षाचे एकूण अनुदान रक्कम रुपये ९४,९०६/- अदा करण्यात आलेले आहे. मौजे गोगरी, हिरंगी, खेर्डा बु. खुर्डा खु. येथील एकूण ३३ लाभार्थींना सुध्दा फळबाग लागवडीचे रुपये १८.१६ लाख अदा करण्यात आले आहे. सन २०२३-२४ मधील लाभार्थ्यांना पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाच्या प्रथम सहामाहीची रक्कम अदा करण्यात आली आहे. तृतीय वर्षातील दुसऱ्या सहामाहीची रक्कम अदा करण्याकरीता अनुदान मागणी महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना यांच्या संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेली आहे व आयुक्त, महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना नागपूर यांचे कार्यालयास सादर केलेली आहे. सदर अनुदान प्राप्त झाल्यानंतर सदर अनुदान अदा करण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.